संकल्प निरोगी महाराष्ट्राचा
सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

डिसेंबर २०२४ । पृष्ठे : ५२

# महाराष्ट्र आरोग्य पत्रिका



संकेत स्थळ :
http.//maha-arogya.gov.in
http.//mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र आरोग्य पत्रिका

डिसेंबर - २०२४

# अंतरंग



१६ क्षयरोगमुक्त महाराष्ट्रासाठी 100 दिवसांची विशेष मोहीम



३६ मेळघाटावरील बाल मृत्यू, माता मृत्यूचा डाग दशकभरानंतर हटला



४४ राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत मोहीम


- आयुक्तांचे मनोगत ..... ५
- संचालकांचे मनोगत (मुंबई) ..... ६
- संचालकांचे मनोगत (पुणे) ..... ७
- संपादकीय ..... ८
- पॅलिएटीव्ह केअर केंद्रामध्ये वर्षभरात २,५५,४६४ रुग्णांनी घेतला आरोग्य सेवेचा लाभ ..... ९
- सिकलसेल रक्त तपासणी करून घेण्याचे आरोग्य विभागाचे आवाहन ..... ११
- खाऊचा कोपरा बाळाच्या पोषणासाठीची गरज ..... १३
- राज्यातील जिल्हा रुग्णालयांत करा मोफत डायलिसीस ..... १४
- क्षयरोगमुक्त महाराष्ट्रासाठी १०० दिवसांची विशेष मोहीम ..... १५
- जागतिक एड्स प्रतिबंध दिन ..... १७
- थंडीच्या लाटेपासून बचावासाठी दक्षता ..... २०
- देश का प्रकृती परीक्षण अभियानास सुरुवात ..... २१
- व्यायाम आणि आरोग्य ..... २२
- मानसिक आरोग्य ..... २४
- 'प्रत्येकासाठी पोषक आहार' ..... २८
- बाल आरोग्यासाठी मुलांना कृष्णकथा सांगा ..... ३०
- ऋतुबदल आणि आरोग्य ..... ३३
- ऋतुबदल आणि आरोग्य (कविता) ..... ३५
- मेळघाटावरील बाल मृत्यू, माता मृत्यूचा डाग दशकभरानंतर हटला ..... ३६
- आशा संवाद ..... ३७
- कविता ..... ४२
- वृत्त विशेष ..... ४४
- लेखकांना विनंती ..... ५०
- केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव आणि महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची मुंबई येथे सदिच्छा भेट ..... ५१

# मेळघाटावरील बाल मृत्यू, माता मृत्यूचा डाग दशकभरानंतर हटला

जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील मेळघाट भागावरील बाल मृत्यू आणि माता मृत्यूचा डाग दशकभरानंतर प्रशासनाच्या शर्तीच्या प्रयत्नाने हटला आहे. गेल्या कालावधीत जिल्हा प्रशासनाच्या विशेष लक्षामुळे आरोग्य सेवा परिणामकारक राबविण्यात येत आहे. तसेच सेवेवर अंकुश ठेवण्यासाठी भरारी पथकांची निर्मिती करण्यात आल्याने आरोग्य सुविधा आणि सेवांच्या दर्जात सुधारणा झाली आहे. गेल्या दहा वर्षाच्या आकडेवारीचा अभ्यास करून मेळघाटात 'मेळघाट मिशन 28' राबविण्यात आले आहे. यात प्रामुख्याने जिल्हा प्रशासनाच्या मदतीने उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, 11 प्राथमिक आरोग्य केंद्रासह विविध सुविधा, 7 फिरती आरोग्य पथक, 6 प्राथमिक आरोग्य पथक, 93 उपकेंद्र, 22 भरानी पथकांमार्फत आरोग्य सेवा देण्यात आल्या आहेत.

**बाल मृत्यू, माता मृत्यूच्या दरात लक्षणीय घट**

आरोग्य सेवा पुरविण्यास प्रशासनाचा पुढाकार आणि भरारी पथकाने मोलाचे योगदान दिले आहे. परिणामस्वरूप 2013-14 मध्ये 338 असणारा बाल मृत्यू हा सन 2023-24 मध्ये 156 वर आला आहे, तर दहा वर्षापूर्वी 14 वर असणारा माता मृत्यू दर हा 5 आणण्यात आरोग्य यंत्रणेला यश मिळाले आहे. महत्त्वाचे म्हणजे उपजत मृत्यू 134 वरून 79 वर आणण्यात आले आहे.

माता मृत्यू आणि बाल मृत्यू जाणीवपूर्वक कमी करण्यासाठी मेळघाट क्षेत्रात गरोदर माता, स्तनदा माता, बालकांना स्त्री रोग व बालरोग तज्ज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. दर 15 दिवसांनी चक्रकार पद्धतीने ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर विशेष तपासणी करण्यात येत आहे. अतिजोखमीच्या बालकांची जबाबदारी बालउपचार केंद्र आणि पोषण संवर्धन केंद्रावर सोपविण्यात आली आहे. सन 2024-25 मध्ये ऑक्टोबर अखेर 25 बालउपाचार केंद्रामध्ये 127 बालकांना भरती करण्यात आले, यात 54 मुलांमध्ये कमालीची सुधारणा झाली आहे. पोषण संवर्धन केंद्रात ऑक्टोबरअखेर 381 बालकांची भरती करण्यात आली, यात 197 बालकांमध्ये सुधारणा झाली आहे.



माता मृत्यू आणि बाल मृत्यूला पायबंद घालण्यासाठी 1 जानेवारी 2022 पासून 'मेळघाट मिशन 28' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रसूतीच्या 28 दिवस अगोदर आणि नवजात अर्भकास 28 दिवस अंगणवाडी सेविका, आशामार्फत दैनिक भेटी देण्यात येते. यामुळे संस्थात्मक प्रसूतीची टक्केवारी 16 पर्यंत पोहोचली आहे. मेळघाटातील अतिसंवेदनशिल गावांमध्ये आरोग्य सेवा पुरविण्यासाठी नवसंजीवनी योजनेंतर्गत धारणी तालुक्यात 12 आणि चिखलदरा तालुक्यात 10 असे 22 भरारी पथके कार्यान्वित आहेत. भरारी पथकात मानसेवी वैद्यकीय अधिकारी अखंडीत सेवा देत आहेत. त्यामुळे माता आणि बाल मृत्यूचे प्रमाण कमी करण्यात भरारी पथके मोलाचे सहकार्य देत आहेत. जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्रीमती वनिता शिंदे यांनी अमरावती, मेळघाट भागात स्थानिक बोली भाषेतून जास्तीत जास्त स्थानिक जनतेला आरोग्य शिक्षण देऊन जनजागृती केली.

मानव विकास कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर अखेर 105 शिबीरे प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर आयोजित करण्यात आले आहे. यात तज्ज्ञांमार्फत 4300 गरोदर माता, 670 जोखीमग्रस्त माता, 737 स्तनदा माता आणि 6 महिन्यापर्यंतचे सर्व बालके, तसेच कमी वजन असलेले 771 बालकांची तपासणी करण्यात येऊन उपचारात्मक कार्यक्रम राबविण्यात आले. यातील सर्वांना संदर्भ सेवा पुरविण्यात आल्या आहेत.

**डॉ. सुरेश असोले,**
जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती